# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०३/२०२५ ( मंगळवार ) संध्याकाळ**


---

## अल्पवयीन बालकावर अनैर्सगिक लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पोलीस स्टेशन मौदा :—फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अप क्रमांक ०१/२०१९ कलम ३७७,५०६ भादंवि सहकलम ४,६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील अल्पवयीन पिडीत बालक हा फिर्यादीचा मुलगा ,वय १० वर्षे असुन पिडीत बालक हा त्याच्या मित्रासोबत खुल्या मैदानात खेळत असतांना यातील आरोपी नामे रोशन उर्फ कमलेश सराटकर, वय २९ वर्षे, रा वडोदा, ता. कामठी, जि. नागपुर हा तेथे आला आणि पिडीत बालकाला जवळ बोलावुन त्याच्या मोटर सायकल वर बसवुन खंते हॉल च्य मागील बाजुला नेवुन त्याच्यासोबत अनैसर्गिक संभोग करून त्याचेवर लैगिंक अत्याचार केला आणि त्याला झालेला प्रकार कोणाला सांगितला तर व्हिडीओ रेकॉर्डीग करून प्रसारीत करण्याची धमकी दिली. नमुद प्रकरणी फिर्यादीच्या रिपोर्ट वरून आरोपी विरूध्द पो.स्टे. मौदा येथे अप क्रमांक ०१/२०१९ कलम ३७७,५०६ भादंवि सहकलम ४,६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद होता.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस उपनिरीक्षक श्री अतुल कावळे यांनी केला .सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. विशेष न्यायालयात दाखल केले होते. आज दिंनाक २५/०३/२०२५ रोजी मा. अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायधीश श्री आर. पी. पांडे यांनी वरील नमुद **रोशन उर्फ कमलेश वसंता सराटकर,रा वडोदा ता कामठी जि नागपुर यास कलम ६ पोक्सो मध्ये २० वर्षे सश्रम कारावास व १०,०००/—रू दंड. दंड न**

**भरल्यास १ वर्ष कारावास , कलम ३७७ भादवि मध्ये ५ वर्षे सश्रम कारावास व ०५,०००/—रू दंड. दंड न भरल्यास ६ महिने कारावास, कलम ५०६ भादवि मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १०००/— रूपये दंड न भरल्यास १ महिने साधी कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. आशावरी परसोडकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस अंमलदार विकास वाटकर, पो.स्टे. मौदा यांनी मदत केली आहे.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या ४ आरोपीतांना अटक १३ जनावरांची सुटका ,खापा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक २४/०३/२५ रोजी खापा पोलीस हद्दीत रात्री पेट्रोलींग करीत असतांना भेडांळा गावाकडुन वाकी कडे जात असतांना भेडांळा गावात एक संशयीत आयशर वाहन रोडवरून जाताना दिसले.वाहन संशयीत वाटल्याने पोलसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्यासाठी इशारा केला परंतु वाहन चालकाने वाहन न थांबविता वेगाने समोर निघुन गेला. सदर वाहनाचा पाठलाग करून पोलीसांनी मौजा भेंडाळा फाटा येथे वाहनास थांबवुन वाहनाची तपासणी केली असता त्यात गोवंश जनावरे दिसली. वाहनात वाहन चालक व त्याचे तीन साथीदार मिळुन आले. वाहन चालक आरोपी नामे **१) शाहनवाज गणी कुरेशी,वय ४५ वर्ष रा. भाजीमंडी कामठी ता कामठी २) तोहीद अहमद खान वय २५ वर्ष रा. भाजीमंडी कामठी त. कामठी, ३) मोहम्मद आमीर मोहम्मद मकसुद कुरेशी, वय २९ वर्ष रा. कोळसाबल पापाच्या बगीच्या जवळ कामठी, ४) रमजान शकील कुरेशी वय २९ वर्ष रा. खापा त. सावनेर** असे आरोपी मिळुन आले. नमुद आरोपी हे १३ गोवंश जानावरे बाधुंन निर्दयते कोंबुन ,चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करतांना मिळुन आले . पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक तपकीरी रंगाचे वाहन क्र. एम एच ४० सी टी ४४७०

किंमती १५,००,०००/— रूपये. **व १३ गोवंश जानावरे १,७८,००० /—** रूपये एकुण किंमती **१६,७८,०००/—** रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

**वरील ४ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन खापा येथे** कलम ११(१) (ड) ,प्रा. छळ प्रति. अधि , ५ (ए) ,९ महा.पशु संरक्षण अधि, सहकलम ६६,१९२ मोटर वाहन अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन सर्व **आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**




पोलीस माहिती कक्ष